भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०२/२०१७

**१) संगनमत करुन सेफ महाबचत गटात दाम दुप्पट होईल अशी बतावनी करुन मुदत संपुन पैश्याची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

सन २००९ ते आज पावेतो यातील दोन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस त्याचे सेफ महाबचत गटात ठेवी गुंतवणुक करुन दाम दुप्पट होईल अशी बतावनी करुन फिर्यादीने ठेवलेल्या ठेवीची मुदत संपुन सुध्दा रक्कम परत न करता ७२,७००/—रु. ची फसवणुक केल्याने फिर्यादी सौ. अनिता आनंद रोडगे वय ४८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड देव्हाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४०९,४२०,३४ भादवी. सहकलम ३ महा. ठेवीहीत संबधांचे रक्षण करण्याबाबत अधिनियम १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. हावरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन महीलेचा पैश्यासाठी शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०७/२०१५ ते १८/०१/०१७ पर्यत यातील फिर्यादी ही आरोपी क्र. १ ची पत्नी असुन त्याचे पासुन फिर्यादीस १० महीण्याची मुलगी आहे फिर्यादीस आरोपी क्र. १ याने तुला सिजर मुलगी झाली त्या दवाखाण्याचा खर्च २५,०००/—रु. आला तो खर्च आपल्या आई वडीलाचे घरुन आण असे आरोपी क्र १ ते ७ यांनी संगनमत करुन मागणी केली फिर्यादीने वडीलाचे घरुन पैसे आनण्यास नकार दिल्याने शारीरीक व मानसीक छळ केले आरोपीतांच्या छळा मुळे फिर्यादीने दिनांक ०९/१२/२०१६ ला पो.स्टे.ला तक्रार दिली सदर तक्रार ही कौटुंबीक स्वरुपाची असल्याने कौटुंबीक सल्ला व मार्गदर्शन केन्द्र लाखनी येथे तडजोड कामी पाठविण्यात आली. परंतु कौटुंबीक सल्ला मार्गदर्शन केन्द्रात फिर्यादी व आरोपी यांच्यात तडजोड झाली नाही असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व कौटुंबीक सल्ला व मार्गदर्शन केन्द्राचे पत्र प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८(अ),५०६,३४ भादवी. सहकलम ३,४ हुंडा प्रतीबंधक कायदा अन्वये येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. हेमने पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) बिना पास परवाना ५ ब्रास रेतीची अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०१/०२/२०१७ चे १२.४० वा. दरम्यान यातील फिर्यादी पंकज विनायक घोडेस्वार वय ४० वर्ष, रा. तलाठी पालोरा हे शायकीय कर्मचारी असुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये बिना पास परवाना अवैधरित्या ०५ ब्रास रेती किमती ५२,०००/—रु. ची चोरीने भरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने व रेतीसह ट्रक घेऊन पळुन गेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९,१८६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**४) अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०१/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, तुमसर, सिहोरा, गोबरवाही, लाखणी, पवनी व लाखांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन ६१ हातभट्टी दारु किंमती ४,३२०/—रु. व ९७० मिली लिटर देशी/विदेशी दारु किंमती ५००/—रू तसेच जुगारातुन १०२/—रु. असा एकुण किंमती ४,९२२/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.